स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच्.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


**संदर्भः रासेयो/२०२३–२४/३०६** **दि.०४/०९/२०२३**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक**
**रासेयो संलग्नित व स्वायत्त महाविद्यालये व परिसंस्था,**
**पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**विषय : विविध कार्यशाळा आयोजनाकरिता ऑनलाईन प्रस्ताव पाठविणे बाबत...**

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दरवर्षी विविध विषयांवर आधारीत उपक्रमांचे आयोजन रासेयो संलग्न महाविद्यालयांमधून करण्यात येते. सन २०२३–२४ या शैक्षणिक वर्षामध्ये खालीलप्रमाणे विषयांवर आधारित कार्यशाळांकरिता मूल्यशिक्षण, युवक युवती उन्नयनीकरण, ऐतिहासिक स्थळे दत्तक योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे विषयांवर आधारीत एक/दोन/तीन/पाच/सात दिवसीय कार्यशाळा/शिबिरे अयोजित करण्याकरिता महाविद्यालयांमार्फत प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

१. **मुल्यशिक्षण अंतर्गत कार्यशाळा** : व्यक्तीमत्त्व विकास शिबिरे/कार्यशाळा, नेतृत्त्व गुणविकास, युवा संवाद, पंचप्रण अदी.
२. **युवक युवती उन्नयनीकरण कार्यक्रम** : स्त्री–पुरूष समानता, लिंगभाव संवेदनीकरण, लोकसंख्या नियंत्रण, कृषिशिक्षण
३. **ऐतिहासीक स्थळे दत्तक योजना** : ऐतिहासीक स्थळ संवर्धन व संगोपन, स्वच्छता अभियान, जनजागृती

ज्या महाविद्यालयांना वरील उपक्रमांतर्गत कार्यशाळा/शिबिरे आयोजित करावयाची आहेत अशा महाविद्यालयांनी वरीलप्रमाणे उपक्रमांचे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात दि. **३० सप्टेंबर, २०२३ पर्यंत** www.bcud.unipune.ac.in→login→menu→nsss→workshop proposal या लिंकवर भरण्यात यावे. प्रस्ताव भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून स्कॅन कॉपी पीडीएफ स्वरूपात तात्काळ स्वरूपात अपालोड करण्यात यावी.

रासेयो विभागाकडून मंजूरी पत्र प्राप्त झाल्यानंतर सदर कार्यशाळा दि. २० फेब्रुवारी, २०२४ पूर्वी आयोजित करून त्यांची देयके तात्काळ जमा करणे आवश्यक आहे.

*टिप : १. पाच व सात दिवसीय शिबिराचे/कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठ दत्तक गावामध्ये आयोजित करणाऱ्या महाविद्यालयांना प्राधान्य देण्यात येईल.*
*२. सदर कार्यशाळांचे आयोजन माहे नोव्हेंबर–२३ ते फेब्रुवारी २४ या दरम्यान करण्यात यावे.*

**संचालक**
**राष्ट्रीय सेवा योजना**